# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील पीक कर्जाचे पुनर्गठण करण्याचे निकष बदलण्याबाबत

**(१) ८४८६२ (१८-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील विशेषेकरून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जिल्ह्यात केवळ भात व नागली पिकाची आणेवारी गृहित धरून आणेवारी काढण्याऐवजी आंबा, काजू पिकांचीही आणेवारी काढून येथील शेतकऱ्यांना पीक कर्जाचे पुनर्गठण करण्याचे निकष बदलण्याची मागणी सिंधुदुर्ग कृषी उत्पन्न बाजार समितीने मागील २ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.पणनमंत्री, मा.कृषीमंत्री, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग आदीकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०९-२०१९) :** (१) होय, सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरते खरे आहे.

(२) व (३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०३/११/२०१५ नुसार कोकणातील कोणत्याही जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा निर्णय प्रस्तावित नाही. तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/१०/२०१८ नुसार सिंधुदुर्ग / रत्नागिरी जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात दुष्काळ जाहीर झालेला नाही अगर प्रस्तावित नाही.

---

### पांढरीचा पूल (जि.अहमदनगर) येथील नेवासे औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योगाला चालना देण्याबाबत

**(२) ९७२८० (०३-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासे औद्योगिक वसाहतीकडे (पांढरीचा पूल) (जि.अहमदनगर) गेल्या २२ वर्षापासून दुर्लक्ष झाल्याने नेवासासह नगर व राहूरी या तीन तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत नसल्याने या औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योगाला चालना देण्याची मागणी सांस्कृती युवा प्रतिष्ठानने दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे संबधित अधिकाऱ्यांकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०९-२०१९) :** (१) व (२) नेवासे औद्योगिक वसाहतीकडे (पांढरीचा पूल) (जि.अहमदनगर) गेल्या २२ वर्षापासून दुर्लक्ष झाल्याने नेवासासह नगर व राहूरी या तीन तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत नसल्याने या औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योगाला चालना देण्याची मागणी सास्कृती युवा प्रतिष्ठानने दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे केली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थालोरो-२०१८/प्र.क्र.९३/उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून राज्यातील सर्व औद्योगिक घटकामध्ये/उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८०टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबत तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा अशा धोरणाची अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नव्याने स्थापित होणाऱ्या/विस्तारीकरण उद्योग घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रोत्साहने मंजूर करताना स्थालोरो-१ या विहित नमुन्यात दिनांक ३० जून पर्यंत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे.

माहे जुलै २०१८ अखेर मोठे व विशाल उपक्रम (संख्या २,५४२) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत २,०३,२७० तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत ७,२९,५२० असा एकूण ८,२६,९१६ इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ८४% अशी आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या २,३१,७४८) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत ६,१३,७३१ तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत २२,०७,३७६ असा एकूण २७,२७,१४० इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ९५% अशी आहे.

उपरोक्त आकडेवारी नुसार राज्यातील औद्योगिक उपक्रमांमध्ये स्थानिक लोकांची टक्केवारी शासन निर्णय दिनांक १७.११.२००८ मध्ये नमूद व विहित टक्केवारीची पूर्तता करीत असल्याचे स्पष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा, लातूर, रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील घरगुती व शेती पंपाच्या वीज ग्राहकांच्या तक्रारी सोडवण्याबाबत**

**(३) १११६७९ (०४-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा, लातूर, रेणापूर (जि. लातूर) तालुक्यातील घरगुती व शेती पंपाच्या वीज ग्राहकांच्या मागण्या व तक्रारी सोडवण्याबाबत मा.उर्जामंत्री यांच्याकडे लातूर ग्रामीण लोकप्रतीनिधिंनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी लातूर येथे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनात पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत :-

१) शेतकऱ्यांचे शेतीपंपाचे १००% वीज बिल माफ करणे.

२) महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत मंजूर शेती पंपाच्या एल.टी.लाईन व इतर पायाभूत सुविधासाठी तातडीने निधी मंजूर करुन कामे करण्यात यावीत.

३) पं.दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजनेअंतर्ग सिंगल फेज रोहित्रांची मंजूर असलेली कामे प्राधान्याने करण्यात यावीत.

४) ग्रामीण भागातील सर्व जुन्या रोहित्रांची दुरुस्ती व नवीन डिस्ट्रीब्युशन बॉक्स बसविण्यासाठी खास रोहित्रे दुरुस्ती योजना राबविण्यात यावी व जिल्हयातील सर्व रोहित्रांची आवश्यक दुरुस्ती व बॉक्स, साहित्य बसविण्यात यावे.

५) शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी (सौर ऊर्जा योजना) लातूर जिल्हयासाठी स्वतंत्रपणे राबविण्यात यावी.

६) जिल्हयाकरिता वीज दर हेक्टरी उत्पन्न जिल्हानिहाय तपासून दर वर्षासाठी ठरविण्यात यावे.

७) प्रशासकीय सोयीसाठी लातूर शहर व लातूर ग्रामीण असे स्वतंत्र विभाग करण्यात यावेत. लातूर ग्रामीण विभागात औसा तालुक्यातील गावे समाविष्ट करण्यात यावीत.

८) महावितरणचे कर्मचारी व अधिकारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात यावीत.

९) महावितरण मंडळात अभियंता व लाईन स्टाफची रिक्त पदे त्वरीत भरण्यात यावीत.

१०) औसा तालुक्यातील शेतीपंपाची व सिंगल फेजची जळालेली रोहित्र महिनोमहिने दुरुस्त करुन घेतली जात नाहीत. याबाबत चौकशी करुन संबंधित दोषी विरुध्द कार्यवाही करण्यात यावी व जळालेली रोहित्र तात्काळ दुरुस्त करुन बसविण्यात यावीत.

(३) शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त कृषीपंप धारकांना शेतीपंप वीज देयकामध्ये सवलत देण्यात येत आहे.

महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत जोडणी दिलेल्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे (HVDS) पायाभूत सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव महावितरणमार्फत तयार करण्यात आला आहे.

दिनदयाळ योजनेअंतर्गत सिंगल फेज रोहित्र बसविण्याचे काम चालू आहे.

औसा उपविभागाअंतर्गत एकूण १०८ रोहित्रांच्या बॉक्सच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे व गावठाण रोहित्रांच्या केबलच्या दुरुस्तीसाठी कंत्राटदाराना आदेश देण्यात आले असून दुरुस्तीचे काम प्राधान्याने करण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेअंतर्गत कामाचे आदेश देण्यात आले असून सदरील कामे प्रगतीपथावर आहेत.

लातूर विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्यासाठी आवश्यक वीज ग्राहक मानांकनाची संख्या पूर्ण होत नसल्याने विभाजन करणे शक्य नाही.

महावितरणच्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केलेले आहे.

औसा तालुक्यातील सन २०१७-१८ या कालावधीमध्ये शेती व गावठाणचे एकूण २७१ विद्युत रोहित्र जळाले होते. विभागीय कार्यालय, निलंगा यांनी जळालेले रोहित्र दुरुस्त करण्यासाठी एकूण २० एजन्सीना काम दिले आहे. सदर एजन्सीकडून पाठपुरावा करुन वेळेत रोहित्रे दुरुस्त करुन घेतले आहेत. औसा उपविभागातील जळालेले रोहित्र ग्राहकांना वेळेवर दुरुस्त करुन देण्यात आले आहेत. तसेच जळालेले रोहित्र जागीच बदलून मिळणेसाठी उपविभागीय स्तरावर दुरुस्त करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील “बॉश “ (माईको) कंपनीत झालेली चोरीची घटना

**(४) ११५३०३ (१९-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या 'मेक इन इंडिया' अनुषंगाने 'मेक इन नाशिक' चे स्वप्न साकारण्यासाठी नाशिक औद्योगिक क्षेत्राची निवड करण्यासाठी राज्य शासनाने 'ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट मॅग्नेटिक महाराष्ट्र' हि जागतिक गुंतवणूक परिषद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील व राज्यातील औद्योगिक वर्तुळातील मोठ्या कंपन्यांमधे समावेश असलेल्या “बॉश” (माईको) मधून सुमारे ११ कोटीचा ऐवज चोरी झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मालमत्ता चोरी प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात तीन वेळा तक्रार दाखल होऊन सुध्दा पोलीसांना गुन्हेगार मिळालेले नाहीत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) अशंता खरे आहे. सातपूर पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या तक्रारीनुसार सदर चोरी ही ११ कोटीची झालेली नसून, ११,४९,६२५/- रुपये किंमतीचा ऐवज चोरी गेलयाबाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानुसार पोलीस तपासात रु.११,४९,६२५/- किंमतीचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आल्याचे संबंधित पोलीस ठाण्याकडील अहवालावरुन दिसून येत आहे.
(३) हे खरे नाही. सदर मालमत्ता चोरीप्रकरणी दोन आरोपी मजदूर यांना अटक करण्यात आली असून, त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दि.३०.०३.२०१८ रोजी दाखल करण्यात आले आहे.
(४) गुन्हयाचा तपास पुर्ण होऊन आरोपी विरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व ठाणे जिल्हयातील दलित विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात कमी किमतीत उत्कृष्ट भोजन पुरविण्याचा पुरवठादाराने दिलेला प्रस्तावाबाबत

**(५) ११७११४ (०२-०८-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे जिल्हयातील दलित विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात सामाजिक न्याय विभागापेक्षा चांगले जेवण व निम्म्यापेक्षा कमी किंमतीत भोजन पुरविण्याबाबतचा प्रस्ताव दीड वर्षापूर्वी सामाजिक न्याय विभागाकडे एका पुरवठादारांनी पाठविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुरवठादाराने शासनाकडून निम्मी रक्कम घेऊन उर्वरित निम्मी रक्कम मुख्यमंत्री फंडातून देण्याची तयारी दर्शविली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव संबंधित विभागाने फेटाळून लावला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्ताव फेटाळण्याची कारणे काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (११-०९-२०१९) :** (१) आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय,पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. २१.०८.२०१८ च्या पत्रानुसार अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌ववत नाही.

---

**महाराष्ट्रात फॉक्स कॉर्न या उद्योग समुहाने उभारण्यात येणाऱ्या गुंतवणूकीबाबत**

**(६) १२६५४३ (०४-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फॉक्स कॉर्न या उद्योग समुहाने महाराष्ट्रात पाच दशलक्ष डॉलरची गुंतवणुक करण्याची तयारी दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा सामंजस्य करार २०१५ मध्ये करण्यात आला असून, त्यानुसार मुंबई पुणे महामार्गानजीक उद्योगांची उभारणी करुन येत्या २०२० पर्यंत ५० हजार रोजगार निर्माण करण्याचे करारात नमुद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उद्योग समुहामार्फत करण्यात येणारी गुंतवणूक व निर्माण होणारे रोजगार याची संद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०९-२०१९) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) फॉक्स कॉर्न कंपनीसोबत सन २०१५ मध्ये राज्य शासनाने सामंजस्य करार केलेला आहे. त्यानुसार सदर कंपनी राज्यात ५ दशलक्ष गुंतवणुक व ५० हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. सदर कंपनीला राज्यातील उपलब्ध जागा व गुंतवणुकीवरील प्रोत्साहने याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. तथापि, सदर उद्योग घटकाकडून अद्याप त्यापुढील कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने, सद्यस्थितीत गुंतवणुक व रोजगार निर्मिती झालेली नाही.

---

**राज्याचा औद्योगिक क्षेत्रातील विकास दर घसरल्याबाबत**

**(७) १२७२९८ (०९-०९-२०१९). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रगतिशील महाराष्ट्राची औद्योगिक क्षेत्रात सन २०१४-१५ च्या तुलनेत औद्योगिक विकास दर सन २०१७-१८ मध्ये घसरून ६.५ टक्क्यांवर आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या बाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विकास दर वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्याचा एकत्रित उद्योग क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृध्दीचा वार्षिक वृध्दिदर सन २०१४-१५ मध्ये ८ टक्के होता. व सन २०१७-१८ मध्ये ६.५ टक्के होता. सन २०१७-१८ मधील उद्योग क्षेत्राचा वार्षिक वृध्दिदर हा पुर्वानुमान अंदाजावर आधारित आहे. वर्ष २०१८-१९ च्या आर्थिक पाहणी अहवालात सदर वृध्दिदर पहिल्या सुधारित अंदाजानुसार तयार करुन प्रकाशित करण्यात येईल. त्यामुळे त्यात बदल होऊ शकतो.

तथापि, उद्योग (वस्तुनिर्माण) क्षेत्रातील आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे :-

सन २०१४-१५ मध्ये मूल्यवृध्दीचा वार्षिक दर ५.१ टक्के असा होता. त्यांनतर २०१५-१६ मध्ये ८.२, २०१६-१७ मध्ये ८.३ टक्के व २०१७-१८ मध्ये ७.६ टक्के दर आहे. सन २०१७-१८ चा ७.६ टक्के दर हा पहिल्या सुधारित अंदाजावर आधारित असून सदर आकडेवारीमध्ये बदल होवू शकतो. त्यामुळे सन २०१४-१५ च्या वार्षिक मूल्यवृध्दीच्या दराच्या ५.१ तुलनेत राज्याने वस्तुनिर्माण क्षेत्रात २०१५-१६ पासून प्रगती केल्याचे दिसून येत आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ ची अंतिम आकडेवारी अपेक्षित आहे. तसेच राज्यातील उद्योग वाढीसाठी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध असून, मेक इन इंडिया सप्ताह २०१६ व मॅग्नेटीक महाराष्ट्र: कॉन्व्हर्जन्स २०१८ कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यात मोठया प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील के पूर्व विभागाचे उपनिबंधक यांचे कार्यालय स्थानिक विभागातच सुरु करण्याबाबत**

**(८) १२७३३५ (०४-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले / अंधेरी / जोगेश्वरी परिसरासाठीतील के पूर्व विभागाचे उपनिबंधक यांचे कार्यालय वडाळा सारख्या दूरच्या ठिकाणी असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील प्रत्येक विभागासाठी उप निबंधक असून त्यांची कार्यालये त्याच विभागामध्ये असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उक्त परिसरातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी उपनिबंधक, के पूर्व विभाग यांचे कार्यालय स्थानिक परिसरात सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०९-२०१९) :** (१) नाही.

(२) होय.

तथापि, मुंबई येथील भौगोलीक परिस्थिती पाहता कार्यालयाच्या कार्यक्षेत्रानुसार मुंबई उपनगर येथे कार्यालयासाठी जागा उपलब्ध नाही. तथापि, अशा जागा मिळविणेबाबतचा प्रयत्न केला जातो.

(३) व (४) महानगर टेलिफोन निगम लि. वांद्रे (पश्चिम) यांच्या मालकीची जागा उपनिबंधक सहकारी संस्था के पूर्व विभाग, मुंबई हे कार्यालय स्थलांतरीत करण्यासाठी पाहण्यात आली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुलांच्या सुरक्षीततेसाठी 'विशेष रक्षा अभियान' राबविण्याबाबत**

**(९) १२७८६५ (०५-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा, परीवार वा सार्वजनिक ठिकाणी मुले सुरक्षीत राहावीत याकरीता 'विशेष रक्षा अभियान' हाती घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०७-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे दि.०२.०६.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थी सुरक्षा संबंधित मार्गदर्शक सूचना कळविण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, पालक, शिक्षकेतर कर्मचारी, कंत्राटी सेवा पुरविणारे कर्मचारी या सर्व घटकांमध्ये परिपत्रक व विद्यार्थी सुरक्षा या विषयाची जनजागृती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने रक्षा अभियान (RACSHA : Raise Awareness for Child Security and Harmony Atmosphere) राबविण्यात आले आहे.

या रक्षा अभियाने आयोजन महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील शासकीय, अनुदानित, विना अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्था संचलित शाळांमध्ये आयोजन करण्यासंबंधीचे निर्देश दि.०४.०९.२०१८ च्या शासन पत्रान्वये क्षेत्रीय यंत्रणेला दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी व हिंगोली जिल्हयातील गटसचिवांचे प्रलंबित असलेल्या वेतनाबाबत**

**(१०) १३१९११ (१०-१२-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्हयातील गटसचिवांचे पंधरा ते सोळा महिन्यापासून वेतन प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी व हिंंगोली जिल्हा गटसचिव कर्मचारी संघटनेने यासंदर्भात दिनांक २४ सप्टेंबर,२०१८ रोजीपासून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार गटसचिवाचे प्रलंबित वेतन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०९-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र शासनामार्फत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सक्षमीकरणासाठी दिनांक ०६/०९/२०१४ नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सन २०१४-१५ या वर्षात परभणी जिल्हयातील ४५५ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांपैकी ११० संस्थेस सक्षमीकरण निधीतून रू.४०,६७,९९५/- निधी वाटप करण्यात आला. सन २०१५-१६ या वर्षात परभणी जिल्हयातील ४५५ विविध कार्यकारी सेवा संस्थांपैकी २०८ संस्थेस सक्षमीकरण निधीतून रू.७९,८६,२५९/- असे एकूण रू.१,२०,५४,२५४/- निधी प्राप्त झाला होता. सदर निधी संबंधित संस्थेस वर्ग करण्यात आला असून सदर निधीमधून प्रथम प्राधान्याने संबंधित संस्थेच्या गटसचिवांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षाचे हिंगोली जिल्हयातील सदर योजनेतून संस्थेस दिनांक १९.०१.२०१९ रोजी अर्थसहाय्य सक्षमीकरण निधी रक्कम रू.८१,८८,२६६/- प्राप्त झालेली आहे. याप्रमाणे गटसचिवांचे वेतन अदा झाले आहे. वेतनापोटी रू.७४४.७७ लाख एवढी रक्कम अदा करावयाची आहे.

---

## राज्याच्या नव्या औद्योगिक धोरणाबाबत

**(११) १३४८७७ (१५-०७-२०१९). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक**

**(किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एका पंचतारांकित हॉटेलमध्ये राज्याच्या नव्या औद्योगिक धोरणाची घोषणा दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या औद्योगिक धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू धोरण केंव्हापासून अंमलात येणार आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०९-२०१९) :** (१) व (२) महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ दिनांक ०७/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले असून, त्यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

• २०२५ पर्यंत महाराष्ट्र एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

• महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील गुंतवणूकीचे व उत्पादनाचे केंद्र बनविणे.

• ६० लक्ष इतका नवीन रोजगार निर्माण करणे.

• सन २०२३ पर्यंत राज्यात रुपये १० लाख कोटी गुंतवणूक आकर्षित करणे.

• सन २०२३-२४ पर्यंत ४० लाख लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

• सन २०२३-२४ पर्यंत राज्याच्या सकल उत्पन्नात उत्पादन क्षेत्राचा हिस्सा २५ टक्क्यापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी उत्पादन क्षेत्राच्या वाढीचा दर १२ ते १३ टक्के पर्यंत राखणे.

• सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे प्रवर्तन करणे-महिला व अनुसूचित जाती-जमाती उद्योजकांवर विशेष लक्ष केंद्रीत करणे.

• राज्यात ईज ऑफ डुइंग बिझनेस (EODB) च्या माध्यमातून उद्योगांचे सुलभीकरण करणे.

• नवीन ग्रोथ सेंटरचे / क्लस्टरचे प्रचलन करणे.

• बेराजगार तरुणांना रोजगार पुरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मीती योजना नवीन फ्लॅगशिप योजनेचा शुभारंभ या नवीन योजनेची आखणी करणे.

वरील महत्वाच्या बाबी तसेच महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१९ चा शासन निर्णय जनतेच्या माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) सदर धोरण दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून अंमलात आले असून, पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी लागू राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात प्लस्टिक पिशव्यांची विक्री होत असल्याबाबत**

**(१२) १३४९४९ (१०-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्लस्टिक बंदी जाहीर करून बराच कालावधी होवून सुध्दा पनवेल शहरात विशेषत: ग्रामीण भागात सुरू असलेल्या प्लस्टिकच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्याला व पर्यावरणाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दुर्लक्षामुळे पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात दुकानदारांकडून प्लास्टिक पिशव्यांची विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागरिकांच्या आरोग्याला व पर्यावरणाला धोका निर्माण करणा-या प्लास्टिक बंदी कडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागावर कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे, असल्यास, कारवाईचे स्वरूप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाच्या प्लास्टीक बंदी अंमलबजावणी धोरणाच्या अनुशंगाने पनवेल महानगरपालिकेच्या हददीमध्ये पालिकेतर्फे प्लास्टिक बंदी कारवाई नियमितपणे सुरु आहे. आजअखेर रु. ४१,४८,७००/- एवढे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे. तसेच १७,५०० कि.ग्रॅ. प्रतिबंधीत प्लास्टिक कारवाई दरम्यान जप्त करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सुध्दा प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणी करीता भरारी पथकाची स्थापना केलेली आहे. त्याव्दारे प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी करण्याकरीता पनवेल महानगरपालिके समवेत संयुक्त कारवाई करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे पनवेल शहरालगतच्या ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायत स्तरावर प्लास्टिक बंदीची कारवाई ग्रामपंचायतीतर्फे सुरु आहे. सबब, पनवेल शहरात प्लास्टिक वापर अतिशय कमी झाला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्हीजेटीआय), मुंबई येथील महाविद्‌यालयामध्ये पायाभूत सुविधां उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१३) १३५२२६ (०९-०७-२०१९). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा मुंबई येथील वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान (व्हीजेटीआय), महाविद्यालयामध्ये खेळांचे मैदान, खेळाचे जुने साहित्य, विद्यार्थीनीसाठी प्रसाधनगृह, स्वच्छतागृह व वसतिगृह इमारतीसह अन्य आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारुनही सुविधा मिळत नसल्याने त्यांच्यात नाराजी पसरलेली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०९-२०१९)** : (१) हे खरे नाही.
(२) वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील पदवी व पदविका अभ्यासक्रमास शासन मान्य शुल्क आकरण्यात येत असून अवाजवी शुल्क घेण्यात येत नाही.
(३) संस्थेत ८५८ विद्यार्थी क्षमता असलेले वसतिगृह उपलब्ध आहे. तसेच ४१८ पदव्युत्तर पदवी विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या वसतिगृहाचे काम सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणोत्तर गुणांना वाव देण्याकरिता संस्थेमध्ये पुढिल सुविधा उपलब्ध आहेत. १.डीईपी (Distance Education Program १५० विद्यार्थी, दृकश्राव्य सुविधेसह २. ऑडीटोरियम २१० बैठक क्षमता, दृकश्राव्य सुविधेसह, ३.इनडोअर गेम सुविधा ५० विद्यार्थी, (बुद्धीबळ, कॅरम, टेबल टेनिस इ.), ४. फुटबॉल व क्रिकेट मैदान खेळाच्या मापदंडानुसार तसेच संस्थेत विभागनिहाय विद्यार्थ्यांसाठी २४ व विद्यार्थीनींसाठी २२ स्वच्छता गृहांची सुविधा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी उपयोजनेअंतर्गत जलसंधारण प्रकल्प राबवण्याकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१४) १३५३७१ (०८-०७-२०१९). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी उपयोजनेअंतर्गत जि.बुलढाणा येथे जलसंधारण प्रकल्प राबविण्याकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने अहवाल सादर करण्याच्या देखील सूचना जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देण्या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. अशोक उईके (२६-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे. सदर निवेदनावर उचित कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविण्यात आले होते.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांनी सूचविलेली गावे ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील असल्याने सदरहू गावांसाठी प्रचलित नियमानुसार आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली, खामगांव व शेगांव (जि.बुलढाणा) या तालुक्यात होत असलेली अवैध सावकारी**

**(१५) १३५३८१ (०६-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली, खामगांव व शेगांव (जि.बुलढाणा) या तालुक्यातील १० ठिकाणी होत असलेल्या अवैध सावकारी प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, महसूल विभाग व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान धाड टाकून मोठ्या प्रमाणात दस्ताऐवज व रोख रक्कम जप्त केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी गैर अर्जदार सुशील सुभाषराव देशमुख यांच्या राहत्या घरी खरेदी खत, ताबे, ईसार पावती, मुदत वाढीचा लेख, प्रतिज्ञालेख इत्यादी आक्षेपार्ह दस्त सापडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०९-२०१९) :** (१) व (२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांचेकडे प्राप्त झालेल्या अवैध सावकारीच्या तक्रारींच्या अनुषंगाने बुलडाणा जिल्ह्यातील चिखली, खामगाव व शेगाव तालुक्यातील १० ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. या धाडी दरम्यान दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत मात्र रोख रक्कम जप्त करण्यात आलेली नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदी नुसार कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाजेगांव (जि.नांदेड) येथील सुतगिरणी, टेक्सकॉम उद्योग व टेक्सटाईल्स मिल बंद असल्याबाबत**

**(१६) १३५४०२ (०४-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाजेगांव (जि.नांदेड) येथील सुतगिरणी, टेक्सकॉम यासारखे उद्योग तसेच टेक्सटाईल्स मिल (एनटीसी) मागील अनेक वर्षापासून बंद पडल्याने हजारो कामगारांवर बेरोजगारीची परिस्थिती निर्माण झाल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे नांदेड भागात अनेक वर्षापासून असलेला कापड उद्योग नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०९-२०१९) :** (१) व (२) नाही . हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यातील नांदेड सहकारी सूतगिरणी मर्या. व रेणूका आदिवासी सहकारी सूतगिरणी मर्या., किनवट या २ सूतगिरण्या अनुक्रमे दि. १२.८.१९९४ व दि.२७.२.२००६ पासून अवसायनात घेण्यात आल्या आहेत. यापैकी नांदेड सहकारी सूतगिरणीची नोंदणी दि. २६.१२.२०११ रोजी रद्द करण्यात आली आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील टेक्सकॉमशी संलग्न असलेल्या ८ संस्थाही अवसायनात घेण्यात आलेल्या आहेत. या संस्थांच्या कामगारांकडून बेरोजगारीबद्दल अद्याप शासनाकडे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. तसेच नांदेड मध्ये नांदेड टेक्सटाईल मिल होती, जी आता BIFR (Board of Industrial Finance Reconstruction) व भारत सरकार यांच्या मान्यतेने जॉईंट व्हेन्चर कंपनी म्हणून ओळखली जात आहे. या जॉईंट व्हेन्चर कंपनीशी आधुनिकीकरणासंदर्भात झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तींची पूर्तता कंपनीने केली नसल्यामुळे तो सामंजस्य करार मॅनेजमेंटकडून संपुष्टात आणण्यात आला. त्याविरुद्ध जॉईंट व्हेन्चर कंपनीने मा. दिल्ली उच्च न्यायालय येथे आव्हान दिले असून सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवा (जि.ठाणे) येथील मनिषानगर परिसरात ४९ एकर जागेत क्रीडा संकुल उभारण्याबाबत**

**(१७) १३५५२१ (०७-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील मनिषानगर परिसरात ४९ एकर जागेत क्रीडा संकुल उभारण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर क्रीडा संकुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१९-०९-२०१९) :** (१) व (२) राज्यविकास समितीच्या दिनांक ३०.०१.२०१५ च्या मा.मुख्यमत्री यांच्या बैठकीत सदर जागा विकासासाठी (सीडीबी.(Central Business District) तत्वावर विकासीत करण्याच्या योजनेनुसार या जागेवरील क्रिडा संकुलाकरीता चालु असलेले संरक्षक भिंतीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून थांबविण्यात आले होते. तथापि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून, प्रधान सचिव नगर विकास विभाग यांना कळविण्यात आले होते की या मोकळया जागेपैकी CRZ बाधीत क्षेत्र म्हणून केवळ पाच हेक्टर जमिन ग्रोथ सेंटरसाठी उपलब्ध होत आहे त्यामुळे ग्रोथ सेंटर (Central Business District) विकसित करणे सकृतदर्शनी नियोजनाच्या दृष्टीने शक्य होईल असे दिसुन येत नाही.

जिल्हा क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी ठाणे यांचे अध्यक्षतेखाली लवकरच बैठकीचे आयोजन करुन, जागेबाबत अंतिम निर्णय घेऊन जिल्हा क्रिडा संकुल बांधकामाचे सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील साडेपाच लाख शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळण्याबाबत**

**(१८) १३६१२४ (१३-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील साडेपाच लाख शेतकऱ्यांना नियमित पिक कर्ज मिळाले नसल्याने शेतकऱ्यांना भांडवलासाठी सावकाराकडे जाऊन कर्ज घ्यावे लागले असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील गत तीन वर्षापासून दुष्काळात सापडलेल्या सुमारे ९० टक्के शेतकऱ्यांना मागील तीन वर्षाची कर्जाची परतफेड करणेही शक्य झालेले नसून जिल्हा बँकेने या शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने वसुली सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना पिक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०९-२०१९) :** (१) व (२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरात प्लास्टीकबंदीनंतर प्लास्टीकला पर्याय म्हणून उत्पादीत होणाऱ्या कापडी पिशव्यांमध्येही प्लास्टीकच असल्याबाबत

**(१९) १३६१२७ (१०-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात प्लास्टीक बंदीनंतर प्लास्टीकला पर्याय म्हणून बहुतांश दुकानांमध्ये मुलायम कापडाप्रमाणे (नॉनवुव्हन/स्पनबाँडेड) दिसणाऱ्या पिशव्यांची विक्री होत असून सदर पिशव्यांमध्ये प्लास्टीक असल्याचे के.टी.ए.एम. महाविद्यालयाच्या सूक्ष्म जीवशास्त्र विभागाच्या संशोधनात दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार सदर पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१८-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे नाही.
(२) नाशिक जिल्ह्यात नॉन वुव्हन बॅग बनविणाऱ्या ०१ उद्योगाला मप्रनि मंडळाने उत्पादन बंद करणेचे निर्देश दि.०५/०७/२०१९ रोजी दिलेले आहेत.मनपा नाशिक कडून एप्रिल, २०१८ ते मे, २०१९ या कालावधीत ६७७ प्रकरणांमध्ये रू.३५,६३,०००/- एवढा दंड आकारण्यात आलेला आहे.तसेच मंडळाकडून ४.०० मे.टन माल जप्त करण्यात आलेला असून रु.१,२०,०००/-दंड सुध्दा वसुल करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे (अंधेरी, मुंबई) समाजकल्याण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क जमा न केल्याबाबत**

**(२०) १३६२६६ (०६-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी, मुंबई येथील सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे समाजकल्याण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे चार वर्षाचे शुल्क जमा न केल्याने, सदर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना वेठीस धरल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पदवीदान समारंभाच्या वेळी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले नसून, महाविद्यालयाने उक्त विद्यार्थ्यांकडून बेकायदा शुल्क वसूल करुन घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शुल्क भरणा करण्यास विलंब होण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या व त्यांच्याकडून बेकायदा शुल्क वसूल करून घेणाऱ्या महाविद्यालयाचे संबंधित प्राधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२३-०९-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही, सरदार पटेल अभियांत्रीकी महाविद्यालयातील सन २०१५-१६ ते २०१६-१७ पर्यंत अनुसुचीत जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची देय रक्कम महाविद्यालयास अदा करण्यात आलेली आहे. सदर महाविद्यालयाची सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई यांच्याकडे अनुसुचीत जाती प्रवर्गातील शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रलंबीत नाही.

सदर महाविद्यालयातील सन २०१५-१६ मधील ज्या विद्यार्थ्यांनी विकास शुल्काची रक्कम महाविद्यालयास अदा केलेली नाही, अश्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार नसल्याची तोंडी तक्रार सदर महाविद्यालयातील ४-५ विद्यार्थ्यांनी सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे दिनांक २२.४.२०१९ रोजी केली होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांनी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसुल अथवा कागदपत्राची अडवणुक केल्यास फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी सक्त ताकीद

दि.२३.४.२०१९ च्या पत्रान्वये देण्यात आलेली असुन पदवीदान समारंभात संबंधित विद्याथ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत संबंधीत प्राचार्यांना सुचीत करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्याचा समावेश करण्याबाबत**

**(२१) १३६३८५ (१०-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या नवीन शालेय अभ्यासक्रमात व पाठ्यपुस्तकात हिंदुहृद्‌यसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्याचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त संदर्भीय प्रस्ताव अभ्यासक्रम व पाठयपुस्तक निर्मिती समिती समोर ठेवला आहे काय, असल्यास, सदरहू समितीकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०९-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास याबाबतचा आशय, पाठ्यपुस्तकात समावेश करण्याबाबत अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती समिती समोर मांडण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकरी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीपासून वंचित असल्याबाबत**

**(२२) १३६४४६ (१५-०७-२०१९). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत कर्जमाफीसाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या राज्यातील ७८ लाख ३८ हजार ६५८ शेतकऱ्यांपैकी दिनांक ३१ मे, २०१८ अखेर केवळ ३७ लाख ३९ हजार शेतकऱ्यांनाच लाभ मिळाल्याची बाब माहे जून, २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील प्रतिक्षा यादीत असलेल्या १२ हजार १७४ शेतकरी अदयाप कर्जमाफीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीस विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत सदर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ साठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांपैकी माहे मे, २०१८ अखेर ४६.५३ लाख लाभार्थी कर्जमाफी व एकरकमी परतफेड योजनेस पात्र आहेत.

३१ मे, २०१८ अखेर ३७.३९ लाख लाभार्थ्यांना १४,९१६ कोटीचा लाभ देण्यात आला. तसेच सद्यस्थितीत ४३.९१ लाख खातेदारांना रु. १८,६१३.२४ कोटीचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत लाभार्थ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची प्रक्रीया सुरु आहे.
(२) नाही.

कर्जमाफी योजनेतंर्गत शेतकऱ्यांच्या अर्जामधील खात्यांची माहिती महाऑनलाईन द्वारे तालुका स्तरीय समितीकडे पाठविली असून सदर समितीकडून पडताळणी करुन पात्र शेतकऱ्यांची खाती पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. महाऑनलाईनकडून जुलै, २०१९ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यामधील ४०,८३२ पात्र लाभार्थ्यांची यादी व १७,५६८ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये खातरजमा करण्यासाठी तालुकानिहाय यादी संबंधीत तालुक्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असलेल्या सभासदांना संबंधीत तालुक्याचे तक्रार निवारण समितीकडे संपर्क साधणेबाबत स्थानिक वर्तमानपत्रामधून आवाहन करणेत आलेले असून कर्जमाफीची प्रक्रीया अद्यापही सुरु आहे
(३) सदर प्रक्रीया ऑनलाईन सुरू असल्याने विलंब झालेला नाही.
(४) कर्जमाफीची प्रक्रीया सुरु असून याबाबत प्राप्त तक्रारीची दखल घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून कर्जमाफी योजना सुरु असे पर्यंत सदर समितीच्या दर आठवड्याला सभा घेणे बाबत सुचना देण्यात आलेल्या आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासलगांव व येवला (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांद्यावर प्रक्रिया करुन उप उत्पादने तयार करण्याकरीता विशेष आर्थिक सहाय्य देण्याबाबत**

**(२३) १३६६०९ (१०-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा)** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव व येवला (जि.नाशिक) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत कांद्यावर प्रक्रिया करुन उप उत्पादने तयार करणारे प्रक्रिया उद्योग निर्माण करण्यासाठी विशेष आर्थिक सहाय्य देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास मा.सहकार व पणन मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०९-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) या संदर्भात पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला असून, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विधवा, परितक्त्या व निराधार महिलांच्या योजना व इतर योजनांमधील अनुदानात वाढ करण्याबाबत

**(२४) १३७१०५ (०७-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनामार्फत विधवा, परितक्त्या व निराधार महिलांना संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, अपंग सहाय्य, राष्ट्रीय कुटुंब लाभ अशा योजना द्वारे लाभार्थ्यांना ६०० ते ९०० रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनुदान अत्यंत कमी असून जाचक अटी व दलाल यामुळे सदर अनुदानात लाभार्थ्यांना किरकोळ गरज देखील भागविता येत नसल्याने उक्त अनुदान २००० ते ३००० रुपये करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१३-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

तथापि, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एक रकमी रु.२०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

मात्र विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची मागणी विविध स्तरावरील लोकप्रतिनिधींनी केली आहे.

(३) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दिनांक २०.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरटीई प्रवेशप्रक्रियेबाबत**

**(२५) १३७३०२ (१०-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये १ लाख १४ हजार ९० पालकांनी आरटीई अंतर्गत अर्ज केले असुन त्यापैकी ७४ हजार ३९० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला असुन ५१ हजार ८०९ विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत प्रवेश मिळाला नसल्याचे माहे जानेवारी २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब आणि मागासवर्गीय प्रवर्गातील बालकांना घराजवळच्या नामांकित शाळेत प्रवेश मिळावा यासाठी शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के कोटा प्रवेश सुरू करण्यात आला होता परंतु या प्रवेशप्रक्रियेची जाहिरात होत नसल्याने सामान्य पालकांपर्यंत माहिती पोहचविण्यास शिक्षण विभाग कमी पडत असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरटीई कायद्यानुसार खासगी शाळांमध्ये पहील्या वर्गाच्या २५ टक्के जागांवर कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक असतांनाही ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, पालघर, सांगली व सातारा सह राज्यातील १८८५ जिल्ह्यातील बहुसंख्य शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारून त्या जागा राखीव ठेवलेल्या असल्याने तसेच उक्त शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी एकाही विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज केलेला नाही, त्यामुळे १४ हजार २६३ जागा रिक्त राहणार आहेत हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, आरटीई प्रवेशप्रक्रियेत अर्ज करताना काही पालकांनी खोटे पत्ते तसेच अक्षांश-रेखांशाचेही खोटे अंतर दिल्यामुळे त्यांना सोडतीद्वारे प्रवेशाची संधी मिळाल्याचा आरोप पहिल्या सोडतीनंतर प्रतीक्षेत असलेल्या नाशिक शहरातील पालकांनी केला असल्याचे माहे, एप्रिल २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या प्रकरणी पालकांनी संबंधित गुरूगोविंद शाळेतील पडताळणी केंद्रावर आक्षेप नोंदविण्याचा प्रयत्न केला असता येथील पडताळणी समितीने आक्षेप घेणा-या पालकांना दाद दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच शिक्षक हक्क कायद्यानुसार (आरटीई) आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या २५ टक्के राखीव प्रवेशामध्ये पुणे जिल्हा आघाडीवर असून पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ७ हजार ७७६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत मात्र प्रवेशासाठी दोनदा मुदतवाढ देऊनही २२ हजार १७६ विद्यार्थी अद्यापही वंचित राहिले असल्याचे तसेच बुलडाणा जिल्ह्यात सी.बी.एस.सी. शाळांमधून दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला नसल्याची बाब माहे मे २०१९ त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, राज्यातील शिक्षण हक्क कायद्याची (आरटीई) कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत व संगणकीय प्रणाली बंद पडणे पालकांत मुलांच्या प्रवेश प्रक्रिया बाबत संभ्रम निर्माण होत असणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत अनेक त्रुटी असल्याचे दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास उपरोक्त संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज न करण्याची कारणे काय आहेत व रिक्त असलेल्या जागा कोणत्या निकषाने भरण्यात येणार आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२०-०९-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शासकिय योजनांची प्रकरणे निकाली काढण्याबाबत**

**(२६) १३७३९३ (०७-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, इंदिरा गांधी विधवा योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी अपंग योजना, संजय गांधी अपंग योजना तसेच इतर शासकीय योजनांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आल व त्यानुषंगाने उक्त प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (११-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

तथापि दि.१०/०३/२०१९ ते २७/०५/२०१९ या कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचार संहिता लागू असल्याने सदर कालावधीत विविध योजनांची बैठक घेण्यात आलेली नाही.
(२) व (३) विशेष सहाय्य योजनांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी संजय गांधी निराधार अनुदान समितीची बैठक घेऊन जून महिन्यात १०६३ प्रकरणे व जुलै महिन्यात ६३५ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा आदिवासी प्रकल्प विभागात ३२० पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) १३७४८४ (०८-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा आदिवासी प्रकल्प विभागात ३२० पदे रिक्त असल्याने आदिवासींच्या विकासात अडथळा येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ३२० पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ही पदे तातडीने भरून आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (१६-०९-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्प कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत एकूण मंजूर पदांपैकी १६२ पदे रिक्त आहेत. तथापि, कमी विद्यार्थी संख्येमुळे शाळा बंद झाल्याने यापैकी १४६ पदांची सध्या आवश्यकता नाही. सदर बाब विचारात घेता प्रत्यक्ष १६ पदे रिक्त आहेत.
(३) सरळसेवेची व पदोन्नतीची रिक्त पदे भरण्यासाठीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा आदिवासी प्रकल्प (जि.यवतमाळ) येथील कार्यालयातील मुक्कामी कर्मचाऱ्यांचा बदल्या होत नसल्याबाबत**

**(२८) १३७५१० (११-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा आदिवासी प्रकल्प कार्यालयात मुक्कामी कर्मचाऱ्यांची गर्दी वाढल्याने आश्रमशाळा कर्मचाऱ्यांसाठी अडचण निर्माण झाल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कित्येक वर्ष बदल्या होत नसून बदली झाल्यास ती रद्द करून घेण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा यामध्ये गैरव्यवहार करण्याकरिता हे कर्मचारी एकाच ठिकाणी कायम आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांची बदली करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (१६-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
मागील तीन वर्षात ८ बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रकल्प कार्यालयात १४ कर्मचारी बदलीस पात्र आहेत.
(४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि.०९.०४.२०१८ नुसार कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनाने बदलींबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रकल्प कार्यालयातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची बदली केली जाते.
तसेच प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील कोपरी येथील आदिवासी विकास विभागाच्या मुलींच्या वसतीगृहातील स्लॅब कोसळल्याबाबत

**(२९) १३७५७८ (०७-०७-२०१९). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील कोपरी येथील आदिवासी विकास विभागाच्या मुलींच्या वसतीगृहात दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्लॅब कोसळल्यामुळे कु.कांचन मोरे ही आदिवासी मुलगी गंभीर जखमी झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (०६-०९-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २६.३.२०१९ रोजी वसतीगृहातील विद्यार्थीनी कु. कांचन मोरे शौचालयात गेली असता शौचालयाच्या स्लॅबचा काही भाग तिच्या अंगावर कोसळून ती जखमी झाली होती. तिच्यावर शासकीय रुग्णालय, ठाणे येथे प्रथमोपचार करण्यात आले असून तिच्या डोक्यावर दोन टाके घालण्यात आले.

त्यानंतर कु.मोरे हिला खबरदारीचा उपाय म्हणून गृहपाल यांनी दिनांक २८.३.२०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे एक्स रे काढण्याकरीता नेले असता, तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दक्षता म्हणून २४ तासासाठी तिला हॉस्पीटलमध्ये दाखल करुन घेतले. कु. मोरे हिची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यक त्या चाचण्या व उपचार करण्यात आले असून तिची प्रकृती ठिक असल्याने संबंधित डॉक्टरांनी तिला दिनांक २९.३.२०१९ रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज दिला आहे.

(२) होय, चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) चौकशीमध्ये दिनांक २६.३.२०१९ रोजी वसतीगृहातील विद्यार्थीनी कु. कांचन मोरे शौचालयात गेली असता दुपारी १२.४० ते १२.५० या दरम्यान शौचालयाच्या स्लॅबचा काही भाग तिच्या अंगावर कोसळून ती जखमी झाल्याचे आढळले. त्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, मुंबई यांनी कार्यकारी अभियंता (स्थावर मालमत्ता विभाग), महानगरपालिका, ठाणे यांना सदर इमारत ही त्यांच्या मालकीची असल्याने इमारतीची दुरुस्ती व स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत दिनांक २८.३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

उपायुक्त, स्थावर मालमत्ता विभाग, ठाणे महानगरपालिका यांनी त्यांच्या दिनांक २६.४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शौचालयाच्या निखळलेल्या स्लॅबच्या प्लॅस्टरची दुरुस्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

**(३०) १३७६०८ (११-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीपासून विनाअनुदानित अंशत: अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक, अध्यापक विदयालये मधील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांनी सुध्दा अनुदानित संस्थेवरील कर्मचाऱ्यांप्रमाणेच सेवा केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीपासून कार्यरत असलेल्या परंतु विनाअनुदानित संस्थेवर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली होती, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२१-०९-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

दिनांक ०१/११/२००५ रोजी वा त्यानंतर नियुक्त झालेल्या १००% अनुदानित शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे.

(४) शासन निर्णय दिनांक २४/०७/२०१९ अन्वये संयुक्त समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्या पुरातत्व विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३१) १३८०९९ (११-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण २७७ वारसा (हेरिटेज) वास्तूंमध्ये राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारितील ५१ किल्यांचा समावेश असून या वारसा वास्तूंच्या देखभालीसाठी सध्याचा कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरातत्व विभागात १२३ पदे रिक्त असुन सन २०१६ ते २०१८ या कालावधी केवळ ६ कर्मचा-यांची भरती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील वारसा (हेरिटेज) वास्तूंमध्ये राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारितील ५१ किल्ल्यांचा समावेश असून या वारसा वास्तूंच्या देखभालीसाठी सध्याचा कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. सद्यस्थितीत पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या अखत्यारित ३७६ राज्य संरक्षित स्मारकाकरिता एकूण ५६ पहारेकरी पदे मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीत ३१ पदे रिक्त आहेत.

(२) होय खरे आहे.

गट अ ते ड मधील एकूण १२८ पदे रिक्त आहेत. संचालनालयात सन २०१६ ते २०१८ या कालावधीत खालीलप्रमाणे एकूण ६ पदे भरती झालेली आहे.

- संचालक (गट-अ) - १ पद (२०१७ मध्ये)
- प्रशासकीय अधिकारी (गट-ब) - १ पद (२०१६ मध्ये)
- लघुटंकलेखक (गट-क) - १ पद (२०१६ मध्ये)
- लिपिक टंकलेखक (गट-क) - २ पदे (२०१६ मध्ये)
- सफाईगार (गट-ड) - १ पद (२०१८ मध्ये)

(३) पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातील तसेच अधिपत्याखालील कार्यालयातील गट क संवर्गातील एकूण २० पदे सरळसेवेने व ड संवर्गातील ३० पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील मैदानांचे नुतनीकरण करुन सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(३२) १३८२८८ (०६-०७-२०१९). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील मैदानाची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्च-एप्रिल, मध्ये मुलांच्या परिक्षा संपल्यावर मुलांना मैदानाची ओढ लागते परंतु शहरातील सर्वच मैदानांची दुरवस्था झाली असुन सुविधांचा अभाव असल्याने तरुणामंध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर शहरातील सर्वच मैदानाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार उक्त मैदानांचे नुतनीकरण करुन सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आशिष शेलार (१९-०९-२०१९) :** (१) व (२) होय, अंशत खरे आहे,

जिल्हा क्रिडा संकुल समिती कोल्हापूर (छत्रपती शिवाजी स्टेडियम) अंतर्गत मैदाने आहेत. क्रिडा विभागाच्या अखत्यारितील छत्रपती शिवाजी स्टेडियम मैदानांची सुधारणा करणे आवश्यक आहे. या मध्ये संरक्षक भिंत बांधणे, फुटबॉल मैदान विकसीत करणे, क्रिकेट पीच सुधारणा करणे इत्यादी.

काही मैदाने महानगरपालिका कोल्हापूर यांच्या अखत्यारीत असुन काही मैदाने शिवाजी विद्यापीठ यांच्या अखत्यारीत आहेत. या विविध मैदानामध्ये माहे एप्रिल-मे या कालावधीत उन्हाळी शिबीरे, स्पर्धा असे उपक्रम राबविण्यात येतात. त्यामुळे सर्वच मैदानांची अवस्था बिकट व सुविधांचा अभाव यामुळे तरुणांमध्ये नाराजी पसरलेली आहे हे खरे नाही.

(३) होय.

शासनाकडून वारंवार पाहणी करण्यात येते.शासनाच्या अखत्यारितील शिवाजी स्टेडियम या ठिकाणी क्रिकेट, फुटबॉल, कुस्ती, बुध्दीबळ, टेबल टेनिस, जलतरण या खेळांची प्रशिक्षण शिबीरे यशस्विरीत्या आयोजित करण्यात आले होते. विभागीय क्रिडा संकुल संभाजीनगर कोल्हापूर येथे ४०० मी. धावणमार्ग, लॉन टेनिस, बास्केट बॉल, खो-खो, व्हॉलीबॉल मैदान सुस्थितीत व वापरात आहेत. व याठिकाणी राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे.महानगरपालिकेच्या अखत्यारित तसेच महात्मा फुले विद्यामंदीर फुलेवाडी या मैदानांचा विविध खेळांकरीता वापर सुरु आहे.विभागीय क्रीडा संकुलातील स्थिगित कामे मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरु आहेत.तसेच जिल्हा क्रीडा संकुल समितीद्वारे मैदानाकरिता आवश्यक असणा-या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न सुरु आहेत व याकरीता शासनाकडून खेलो इंडिया, क्रिडांगण विकास अनुदान योजना अशा विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगाव (जि.अकोला) येथील शेतकऱ्यांना तुरीचे अनुदान देण्याबाबत**

**(३३) १३८४७३ (०७-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगाव (जि.अकोला) येथील अनेक शेतकरी तुरीच्या अनुदानापासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तुरीचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०९-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) अकोला जिल्ह्यातील देवगांव येथील ९७ पात्र शेतकऱ्यांपैकी ८० शेतकऱ्यांना आधार लिंक बँक खात्यात रुपये १०,९९,७६० अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित १६ शेतकऱ्यांचे बँक खाते आधार लिंक नसल्याने, त्यांना अनुदानवितरित होत नाही. त्या शेतकऱ्यांना NEFT/RTGS द्वारे निधी रुपये २,५४,२४४ इतके अनुदान वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याबाबतचा निर्णय घेण्यास होत असलेला विलंब**

**(३४) १३८६४२ (११-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, शासनाने मराठी भाषेचे संवर्धन व विकास करण्यासाठी, मराठी शाळांचे सशक्तीकरण करण्याकरिता सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करणेबाबत अनेकवेळा आश्वासन देऊनही यावर कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मराठी भाषेचे संवर्धन व विकास करण्यासाठी, सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याकरिता निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच निर्णयात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**ॲड. आशिष शेलार (०९-०९-२०१९) : (**१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे पूर्व (मुंबई) येथील एमआयजी-६ या सोसायटीच्या सदस्यांनी पदाधिकारी यांचेविरोधात केलेली तक्रार**

**(३५) १३८६४८ (१३-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील 'एमआयजी-६' या सोसायटीच्या काही सदस्यांनी पदाधिकारी यांचे विरोधात तक्रार केली असता व यावर दुय्यम निबंधकाचे सोसायटी समिती बरखास्त

करुन प्रशासकाची नियुक्ती करण्याचे आदेश असतानाही, अद्याप यावर शासन तथा दुय्यम निबंधकांनी कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात दुय्यम निबंधकांनी कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरहू अल्प मतातील समितीने उपनिबंधकांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन, सभा घेऊन बेकायदा व नियमबाहय कार्यवाही केल्याबाबत शासनातर्फे सदरहू समिती विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी उपनिबंधक, दुय्यम निबंधक आणि अल्प मतातील समिती सदस्यांनी आर्थिक गैरव्यवहार केले असल्याने सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन चौकशी व कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१९) :** (१) व (२) नाही, उपनिबंधक, सहकारी संस्था, पश्चिम उपनगरे, म्हाडा, मुंबई या कार्यालयाकडून सदर प्रकरणी कार्यवाही झालेली आहे. मात्र, संस्थेने या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका (एल) क्रमांक १०४८/२०१९ वरील सुनावणी दरम्यान दि.१.४.२०१९ च्या आदेशान्वये सदर याचिकेचा अंतिम निर्णय होईपर्यंत उपनिबंधक, सहकारी संस्था, यांना या संबंधात निर्णय घेण्यास स्थगिती दिली आहे.
(३) उपनिबंधक, सहकारी संस्था, पश्चिम उपनगरे, म्हाडा, मुंबई व संस्थेची सध्याची समिती सदस्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत कोणतेही प्रकरण निदर्शनास आलेले नाही, त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**थेऊर (जिल्हा पुणे) येथील शेतकऱ्यांसह महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची थकीत देणी अदा करण्याबाबत**

**(३६) १३८६५२ (११-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) थेऊर (जिल्हा पुणे) येथील यशवंत सहकारी साखर कारखाना संचालकांनी तोट्यात दाखवल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदरहू साखर कारखान्यांना टाळे लावण्यापेक्षा अतिरिक्त जमीन विकून १२२ शेतकऱ्यांसह महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची थकीत देणी देण्याचे आदेश दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे मे, २०१९ पर्यंत शासनाने अतिरिक्त जमीन विक्री करुन, शेतकऱ्यांसह सहकारी बँकेची थकित देय देणी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अद्यापपर्यंत किती देय देणी बाकी आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन शेतक-यांची संख्या १२२ नसून २१६०७ असल्याची बाब नमूद करुन याचिकेतील पक्षकारांनी शेतक-यांच्या हितासाठी काही पाऊले उचलावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दि.९ एप्रिल, २०१९ रोजी दिले आहेत.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जागेचे मुल्यांकन करुन कारखान्याची देणी निश्चित करणेकरीता प्रादेशिक सहसंचालक, पुणे यांनी समिती नियुक्त केली आहे. मुल्यांकन अहवाल अप्राप्त आहे.

कारखान्याकडील दि.३१.३.२०१७ अखेर वित्तीय संस्थांचे कर्जे रु.१५१०.२२ लाख, सभासद, कामगार,ऊस उत्पादक व तोडणी वाहतूक, व्यापारी देणी रु.४१०८.००लाख, भविष्य निर्वाह निधी रु.१२८.७२ लाख व ऊस खरेदी कर व मुंबई विक्री कर इ. थकबाकी रु.१२७९.०९ लाख अधिक व्याज देय बाकी आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील बंद पडलेले लहान उद्योग पुनर्जिवित करण्याबाबत

**(३७) १३८७०९ (११-०७-२०१९). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील लहान उद्योग बंद पडलेले असून सदर उद्योग पुनर्जिवित करण्यासाठी नवीन धोरणे व पॉलिसी तयार करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०९-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर या कार्यालयाकडे स्थायी नोंदणीकृत लघु व मध्यम उद्योगांना व वीट उत्पादक उद्योगांना महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांचेकडून कोळसा पुरवठा करण्यात येतो.

वीट उत्पादक उद्योगांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडे विहित पध्दतीने कोळसा मागणी अर्ज सादर केले नाहीत. अन्य उद्योगांना मागणी प्रमाणे कोळसा पुरवठा करण्यात येत आहे.

सामुहिक प्रोत्साहन योजना -२०१३ :- राजूरा क्षेत्रात या योजनेअंतर्गत ९ उद्योग घटकांना मुद्रांक शुल्क सवलत मंजूर केली असून, या ९ उद्योग घटकांपैकी ७ उद्योग घटक उत्पादनात गेले आहेत.या उद्योगामध्ये रु.४६८३.७२ लक्ष गुंतवणूक असून, २०१ रोजगार उपलब्ध झाला आहे. या ७ उद्योग घटकांना रु.४७७७.२५ लक्ष औद्योगिक प्रोत्साहन मंजूर करण्यात आले आहे.

राजूरा क्षेत्रामध्ये जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे :-
अ) सुधारित बीजभांडवल योजना :- या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ ते सन २०१८-१९ या कालावधीत १८ लाभार्थींना एकूण रु.४४.१५ लक्ष कर्ज बँकेमार्फत मंजूर करण्यात आले आहे. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर यांच्याकडून रु.८.८३लक्ष बीजभांडवल वाटप करण्यात आले आहे.
ब) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :- या कार्यक्रमांतर्गत ७ लाभार्थींना रु.३३.०० लक्ष कर्ज बँकेमार्फत मंजूर करण्यात आले असून, रु.५.७५ लक्ष मार्जिन मनी वितरित करण्यात आले आहेत.

सुशिक्षित बेरोजगारांची कर्ज प्रकरणे मंजूरी होणेकरीता जिल्हा, तालुका स्तरावरील बैठकांमध्ये तसेच बँक शाखा स्तरावर पाठपुरावा करण्यात येतो.

---

**हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील निराधारांचे मानधन अदा करण्याबाबत**

**(३८) १३८८३० (१०-०७-२०१९). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अपंग, विधवा, परितक्त्या अशा शेकडो निराधारांचे मानधन मागील तब्बल सहा महिन्यापासून मिळाले नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू निराधारांचे प्रलंबित असलेले मानधन लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांकडुन विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक फसवणूक**

**(३९) १३८९६४ (०९-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये मनमानी पध्दतीने विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणुक होत असुन केवळ मार्गदर्शक तत्वांच्या आधारे अशा विद्यापीठांना परवानगी देणे चुकीचे असल्याने या विद्यापीठांवर निर्बंध घालण्यासाठी यंत्रणा तयार करण्याचे आदेश मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिनांक ०४ डिसेंबर,२०१८ रोजी तसेच वारंवार प्रशासनास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली तसेच राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांकडुन होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्थिक फसवणुकी विरोधात कारवाई करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी राज्यात स्थापित झालेल्या स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये शुल्क नियंत्रण गरजेचे असून, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठातील शुल्क हे समितीद्वारा अथवा शासनामार्फत ठरविण्यात यावे अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.
(२) स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठीच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या अधिनियमानुसार स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांनी फी निश्चिती समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

तसेच राज्यातील सर्व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या शुल्क निर्धारणासाठी समान नियमावली तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम (जि.कोल्हापूर) मध्ये सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध होणेबाबत

**(४०) १३९४१८ (०६-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियममध्ये (जि.कोल्हापूर) १४/१७ व १९ वर्षाखालील मुले-मुलींच्या राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय स्पर्धाचे आयोजन तसेच उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबिर घेतले जात असून याचा फायदा राज्यातील कोल्हापूरसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सातारा व सोलापूर येथील उदयमुख स्पर्धकांना होत आहे परंतु या हॉकी स्टेडियमवर स्पर्धा काळात व सराव शिबिराच्या वेळी राहण्यासाठी सर्व सोयी सुविधांयुक्त वसतिगृह व शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यायाम शाळा तसेच फ्लड लाईट इ सुविधा नसल्याने स्पर्धकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार सदरच्या आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१९-०९-२०१९) :** (१) व (२) होय, जिल्हा क्रीडा अधिकारी कोल्हापूर या कार्यालयने या ठिकाणी दि.०५ मे ते ३० मे या दरम्यान उन्हाळी प्रशिक्षण शिक्षण शिबिर आयोजित कले होते. या मध्ये १७ मुली व ५५ असे एकुण ७२ खेळाडु सहभगी झाले होते.या कालावधीत सुविधा व अडचणी याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत. मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम (जि.कोल्हापूर) येथे शासनाच्या २०१४, २०१७, २०१९ या वर्षी पुढे नमुद केलेले मुले-मुली यांच्या जिल्हास्तर विभागस्त व राज्यस्तर स्पर्धांचे व उन्हाळी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन केले जाते. त्यामुळे कोल्हापूर सह राज्यातील इतर खेळाडूंना लाभ होत आहे.

सद्यस्थितीत स्पर्धा व प्रशिक्षण शिबीराकरीता दोन हॉकी क्रिडांगणे सुस्थितीत कार्यरत असुन, खेळाडूंना नऊ खोल्यांचे वसतीगृह व व्यायामशाळा उपलब्ध आहे. सदर क्रिडांगणावर फ्लडलाईटची व्यवस्था सद्यस्थितीत उपलब्ध नाही. खोलो इंडिया अंतर्गत ॲस्ट्रोर्हफ मैदान अद्यावत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.सदरस्टेडियम महानगरपालिका कोल्हापूर यांच्या अखत्यारीत येत असल्याने त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महापालिकेची आहे. सदर स्टेडियमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्रशासनाच्या खेलो इंडियाअंतर्गत विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता आयुक्त म.न.पा. कोल्हापूर यांनी दिनांक २७.१०.२०१६ अन्वये ११.४० कोटी या रकमेचा प्रस्ताव राज्यशासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव दिनांक ३०.०६.२०१७ अन्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर अद्यावतीकरणाची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**व्यापाऱ्यांनी ९० टक्के शेतीमाल हमीभावापेक्षा कमी किमतीत खरेदी केल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान**

**(४१) १३९६२३ (१०-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने हमीभावाने तूर, मुग, उडीद, सोयाबीन, हरभरा आदि शेतमालाची खरेदी करण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून खरेदी केंद्र सुरु केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र यंदा खरीप पिकांसाठी खरेदी केंद्र सुरु करण्यास उशीर झाल्यामुळे बाजारात व्यापाऱ्यांनी ९० टक्के शेतीमाल हमीभावापेक्षा कमी किमतीत खरेदी केला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात ही खरेदी केंद्रे नोव्हेंबर महिन्यातच सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०९-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) नाही.

राज्यात मूग व उडीद हमीभावाने खरेदीसाठी दिनांक २५/९/२०१८ पासून व सोयाबीन खरेदीसाठी दिनांक १/१०/२०१८ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली होती. तसेच दिनांक १६/१०/२०१८ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरु करण्यात आली होती.
(४) राज्यातील कडधान्य व तेलबियांचे उत्पादन व बाजार दर यांच्या वस्तूस्थितीवरुन हमीभावाने खरेदी करण्यासाठी सप्टेंबर महिन्यात नोंदणी सुरु केली जाते व ऑक्टोबरमध्ये खरेदी केंद्रे सुरु केली जातात. ती जून महिन्यापर्यंत सुरु राहतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रेशन दुकानातून कार्डधारकांना दूध देण्याच्या निर्णयाबाबत**

**(४२) १३९६६५ (१०-०७-२०१९). श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री. संदीपानराव भुमरे (पैठण), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री. किशोर पाटील (पाचोरा), श्री. नारायण पाटील (करमाळा), श्री. वैभव नाईक (कुडाळ), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व)** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकृत रास्तभाव दुकानामध्ये दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानंद ब्रॅण्डचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राज्यातील सर्व रास्तभाव दुकानामध्ये दिनांक ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये महानंद ब्रॅण्डचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्यास परवानगी देण्यात आली असून दिनांक ५ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयानुसार राज्यभरातील रास्तभाव दुकानामध्ये आरे ब्रॅण्डचे दुध व दुग्धजन्य उत्पादने विक्रीस ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेचा तपशील काय आहे व सदर योजना राज्यात कोणकोणत्या जिल्ह्यात व केंव्हापासून राबविण्यात आली आहे वा येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-०९-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र राज्यातील शासकीय दुध योजनेत उत्पादित होणारे दुध व दुग्धजन्य पदार्थ तसेच महानंदा व आरे ब्रॅण्ड यांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ राज्याच्या सर्व अधिकृत रास्तभाव दुकानातून विक्रीसाठी ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी देण्यात येणाऱ्या कमिशन इ.बाबत महानंदा/ आरे ब्रॅण्डचे अधिकृत वितरकांशी रास्तभाव दुकानदार यांनी परस्पर संपर्क साधावयाचा आहे.

सदर योजना मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात दि.१९.१.२०१८,दि.९.३.२०१८ व दि.५.४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असून त्यास अत्यल्प प्रतिसाद आहे.राज्यात उर्वरित विभागात दुकानदारांकडून अनुकूल प्रतिसाद नाही.

---

## सांगोले (जि.सोलापूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वखार महामंडळाच्या वतीने शीतगृहाची उभारणी करण्याबाबत

**(४३) १३९७७५ (१०-०७-२०१९). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोले (जि.सोलापूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत ७५ टक्के केंद्र शासन व २५ टक्के वखार महामंडळाच्या निधीतून अंदाजे ३.७५ कोटी किमतीचे एक हजार मेट्रिक टन क्षमतेचे सध्याच्या वखार महामंडळाच्या दोन गोडाऊन जवळ शीतगृह उभारण्याचे वखार महामंडळाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सांगोले कृषी उत्पन्न बाजार समितीने तीस वर्षाच्या कराराने वखार महामंडळास माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वखार महामंडळाच्या गोडाऊन नजीक २० गुंठे जमीन नाममात्र भाड्याने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शितगृह उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०९-२०१९) :** (१) होय.

(२) कृषि उत्पन्न बाजार समितीने १८ गुंठे जमिन ३० वर्षाच्या कराराने वखार महामंडळास माहे मार्च-२०१९ मध्ये नाममात्र भाड्याने दिलेली आहे.

(३) वखार महामंडळाकडून तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करुन, शितगृहाचे अंदाजपत्रक तयार केले आहे व निविदा प्रक्रियेची कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामाचे कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) १४०२४१ (११-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातून सन २०१८-१९ च्या खरीप व रब्बी हंगामात एकूण ३ हजार ७५४ कोटी ९७ लाख रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना वितरणाचे उद्दीष्ट देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रत्यक्षात मात्र १ हजार ९१४ कोटी ३१ लाख रुपयेच वितरित करण्यात आले असून, यासंदर्भात दिनांक २ एप्रिल, २०१९ रोजी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कमी निधी वितरीत करण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त बैठकीत कोणता निर्णय घेतला असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१९) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकऱ्यांना तुर व हरभऱ्यांच्या हमीभावाची रक्कम मिळण्याबाबत

**(४५) १४०४५२ (११-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च ते एप्रिल, २०१८ या कालावधीत तुर, हरभरा विकलेल्या ९० हजार शेतकऱ्यांचे सुमारे ११७ कोटी रुपये मिळाले नसल्याचे दिनांक १५ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित मार्केटींग फेडरेशन यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या हमीभावाची रक्कम तात्काळ मिळावी यासाठी नाफेडला पत्र पाठविल्याचेही निदर्शनास येत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची हमीभावाचे रक्कम तात्काळ मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०९-२०१९) :** (१) नाही.

हंगाम २०१७-१८ च्या एप्रिल,२०१८ अखेरी तूर व हरभरा खरेदीचे चुकारे नाफेडकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या रकमेतून ऑनलाईन पोर्टलवरुन थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केलेली आहे.
(२) होय.
(३) व (४) हंगाम २०१७-१८ मधील हमीभावाने खरेदी केलेल्या तूर व हरभऱ्याच्या चुकाऱ्यांची रक्कम मंजूर शासन हमीद्वारे बँककडून कर्ज उपलब्ध करुन अदा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीचे पणन विभागाकडे असलेली थकीत रक्कम मिळण्याबाबत

**(४६) १४०९७९ (११-०७-२०१९). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीने सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीत तुर, चना, मका, सोयाबीन खरेदी करण्यात आलेली असून या खरेदी पोटी पणन विभागाकडे १६ लाख ६७ हजार ९९३ रूपये थकीत असून ही रक्कम मिळण्यासाठी सदर समितीने दिनांक २५ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पणन अधिकारी नागपूर यांना पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर थकीत रक्कम मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०९-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) नाफेडकडून अनुषंगिक खर्चाच्या रक्कमा जस जश्या प्राप्त होत आहेत, त्यानुसार संबंधित संस्थाना त्यांच्या देय रक्कमा अदा करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांबाबत**

**(४७) १४११४० (११-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात सन २०१४-१५ ते २०१९ पर्यन्त पाणीपुरवठयाच्या किती योजना मंजूर करुन कार्यान्वित करण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, किती योजनाची कामे मुदतपूर्व वा मुदतीत सुरु करण्यात आली, त्यापैकी किती योजना बंद करण्यात आल्या व किती सद्यस्थितीत सुरू आहेत तसेच मंजूरी मिळूनही सुरू करण्यात आल्या नाहीत अशा सर्व योजनांची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास दोषी असणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२०-०९-२०१९) :** (१) गडचिरोली जिल्हयात सन २०१४-१५ ते सन २०१९ (माहे ऑगस्ट २०१९ अखेर) पर्यंत एकूण ८० स्वतंत्र व ०४ प्रादेशिक अशा एकूण ८४ पाणी पुरवठा योजना विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एकूण ४७ स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करुन कार्यान्वीत करण्यात आलेली असून ३७ योजनांवरुन पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) मंजूर ८४ योजनांपैकी ६९ पाणी पुरवठा योजनांची कामे मुदतपूर्व वा मुदतीत सुरु करण्यात आली असून उर्वरित १५ योजना निविदा प्रक्रियेत आहेत. कामे पुर्ण ४७ योजनांपैकी ०९ योजना वीज जोडणी झालेली नसल्याने व ०१ योजना थकित वीज देयकामुळे अशा एकूण १० योजना बंद आहेत.

(३) होय, सदर प्रकरणी शासन स्तरावरून चौकशी करण्यात आलेली असून ज्या योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत व वीज जोडणी अभावी कार्यान्वीत करण्यात आलेल्या नाही अशा योजनांना तात्काळ वीज जोडणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ज्या योजना प्रगतीत आहेत त्या योजना दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच ज्या योजनांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. अशा योजनांचे कार्यारंभ आदेश वितरीत करुन या योजनांची कामे तात्काळ सुरु करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने याबाबत कोणावरही कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील बंद पडलेल्या उद्योगाबाबत**

**(४८) १४१७४७ (१५-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील २५५७ उद्योग बंद पडले असून त्यामध्ये कुटीर आणि इतर छोटया-मोठया उद्योगांचा समावेश असून, यातील २० ते ३० टक्के औद्योगिक कारखान्याचा समावेश असल्याची बाब मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिकमध्ये गेल्या दशकात एकही मोठया उद्योग समूह आलेला नाही, आजारी उद्योगाचे पुनर्वसन करणे किंवा दुसऱ्या कंपन्याकडे ती जागा स्थलांतरीत करणे आवश्यक असताना, अनेक उद्योग त्याच स्थितीत गेल्या काही वर्षापासून बंद आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंद पडलेल्या उद्योगांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच दुसऱ्या कंपनीकडे ती जागा स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाने नाशिक जिल्हयात एकूण १४ विशाल उद्योगांबरोबर सामंजस्य करार केला असून, त्यानुसार जिल्हयात एकूण ९२६८.६९ कोटी गुंतवणूक व ७६३४ रोजगार अपेक्षित आहे.

लघु, मध्यम व मोठे उद्योगांबरोबर शासनाने “मेक इन इंडीया” व “मॅग्नेटीक महाराष्ट्र” अंतर्गत जिल्हयातील २३१ उद्योग घटकांशी सामंजस्य करार केला असून, त्यात रु.४६३५.८९ कोटी गुंतवणूक व १७००४ रोजगार अपेक्षित आहे.

महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१३ नुसार नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या बंद उद्योग घटकांसाठी बंद उद्योग घटकांची जमिनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येणाऱ्या दृष्टीकोनातून अशा उद्योग घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक २० मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार विशेष अभय योजना जाहीर केली होती. सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१मार्च, २०१७ पर्यंत होता.

नुकतेच महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१९ जाहीर करण्यात आले असून, यामध्ये बंद उद्योग घटकांच्या मालमत्तेचा औद्योगिक प्रयोजनार्थ पुनर्वापर करणेकरीता विशेष अभय योजना, औद्योगिक समूह विकास, औद्योगिक जमिनीचा ६० टक्के औद्योगिक व ४० टक्के पूरक सेवा तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक सारखी प्रोत्साहने, मोठया भूखंडावर पुनर्विकास प्रकल्प राबविणे अशा प्रकारची प्रोत्साहने देऊन उद्योगांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

---

**अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची चांदुर बाजार शाखा शेतकऱ्यांना कर्ज देण्यात टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(४९) १४१९१९ (१५-०७-२०१९). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची चांदुर बाजार शाखा शेतकऱ्यांना कर्ज देण्यात टाळाटाळ करीत असल्याची तक्रार माधान, ता.चांदुर बाजार, जि.अमरावती येथील सेवा सह सोसायटीने मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१९) :** (१) होय.

(२) विभागीय सहनिबंधक कार्यालयाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला दिनांक ०४.०९.२०१८ व ०६.०९.२०१८ च्या पत्रान्वये संबंधीतांना पीक कर्ज वाटप करण्याबाबत सुचित केले होते. तथापी बँकेने कर्ज वाटप न केल्यामुळे विभागीय सहनिबंधक कार्यालयाचे दिनांक १२.०९.२०१८ रोजीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(२) आदेशान्वये बँकेस निर्देश दिलेले होते. त्यावर बँकेने मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ६१३२/२०१८ व ६६५८/२०१८ दाखल केली असता मा. उच्च न्यायालयाने रीट याचिका क्र. ६१३२/२०१८ खारीज केली आहे व रीट याचिका क्र. ६६५८/२०१८ मध्ये दिनांक ०८.१०.२०१८ रोजीच्या आदेशान्वये कलम ७९(२) चे निर्देशाला अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील क्रिडा संकुलातील जलतरण तलावाच्या दुरुस्तीबाबत**

**(५०) १४१९४० (०६-०७-२०१९). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील क्रिडा संकुलातील आर्थिकदृष्टया नफ्यात चालणाऱ्या जलतरण तलावाची गळती दाखवून त्याच्या दुरुस्तीकरिता १३ लाखा रुपयांचा खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१९-०९-२०१९) :**(१) व (२) दि.०५.मार्च २००६ रोजी पासून हा जलतरण तलाव बुलढाणा शहरातील खेळाडू व क्रीडाप्रेमी व नागरिकासाठी खुला करुन देण्यात आलेला होता. तसेच हा तलाव १२ व १३ वर्ष जुना आहे.टाईल्स निखळल्याने लिकेज होउन या

जलतरण तलावातील पाणी कमी होत असे,यामुळे खेळाडुंना कोणत्याच प्रकारची ईजा होउ नये म्हणुन सन २०१७ पासून तलाव बंद ठेवण्यात आला होता. जिल्हा क्रीडासंकुल कार्यकारी समितीद्वारे नियुक्त वास्तुविशारद श्री जयंत सोनुने यांचेकडून र,७,७४,६००/-इतक्या रकमेचे या जलतरण तलावाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले व त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता घेऊन ते जिल्हा क्रिडा संकुल समितीकडे सादर करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी व क्रीडा संकुल कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने ई-निवीदा प्रक्रिया राबविण्यात आली व त्यास अंतीम मान्यता देवून, बांधकाम कंत्राटदार श्री राजेश रमेश इंगळे यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले.त्यानुसार या जलतरण तलावाची दुरुस्ती करण्यात आली व पुनश्च तपासणी करण्यात आली. पुन्हा पाणी कमी होत असल्याचे निर्देशनास आले. या जलतरण तलावात पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसल्याने पाणी टँकरने आणून जलतरण तलावात सोडण्यात येते. या तलावाची दुरुस्ती केलेल्या कंत्राटदारास अद्याप कोणत्याही प्रकारचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

(३ प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.